|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

(पुर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

---

## कार्यालयीन आदेश

महामहिम राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती कार्यालय निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी-कृषी विद्यापीठा अंतर्गत शिक्षण घेतअसलेल्या विद्यार्थ्यांचे संशोधन समाजउपयोगी होण्याकरीता **अविष्कार** स्पर्धात्मक उपक्रम आयोजित करुन संशोधकांना व्यासपीठ दरवर्षी उपलब्ध करुन देते.

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ अविष्कार स्पर्धेत विद्यापीठाचा संघ सहभागी होण्यासाठी विद्यापीठस्तरावर आंतर महाविद्यालयीन अविष्कार स्पर्धेचे आयोजन जिल्हापातळीवर दरवर्षी विद्यापीठा मार्फत करण्यात येत असते.

प्रस्तुत अनुषंगाने प्राप्त झालेल्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता अविष्कार उपक्रमासाठी जिल्हास्तरीय स्पर्धा, राज्यस्तरीय स्पर्धेकरीता संघ निवडणे आदिंचे नियोजन व आयोजन होण्याकरीता **अविष्कार २०१९-२०, समन्वयक म्हणून प्रा. एस. आर. चौधरी, गणित प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव तर उपसमन्वयक म्हणून प्रा. ए.जी. इंगळे, जीवशास्त्र प्रशाळा कबचौउमवि, जळगाव** यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात येत आहे. त्यासाठी त्यांना आवश्यक सुविधा व सहाय्य विद्यापीठामार्फत करण्यात येईल.

उपरोक्त अनुषंगाने संबंधितांनी जिल्हानिहाय स्पर्धेचे आयोजन तसेच राज्यस्तरीय **अविष्कार** स्पर्धेकरीता संघ निवड, यातील राज्यस्तरीय गुणवंत संशोधक स्पर्धकास पश्चिम विभाग, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन उपक्रम / स्पर्धा मार्गदर्शन करणे व पुढील प्रक्रीया करण्यासंदर्भात आवश्यक ते नियोजन करून त्याचा अहवाल वेळोवळी मा.कुलगुरु महोदयांकडे सादर करावा.

**(भ.भा.पाटील)**
कुलसचिव

जा.क्र. कबचौउमवि/१४/अविष्कार- ४३/३१२ /२०१९, दि. ०४.१०.२०१९

**प्रति,**

१. प्रा. बी.एल चौधरी, जीवशास्त्र प्रशाळा कृपया, आपल्याकडील **अविष्कार २०१८-१९,** समन्वयकाचा कार्यभार प्रा. एस.आर. चौधरी यांच्याकडे सोपवावा व अनुपालन अहवाल मा.कुलगुरु महोदयांकडे सादर करावा.
२. प्रा.ए.एस.पाटील, संगणकशास्त्र प्रशाळा, कृपया, आपल्याकडील **अविष्कार २०१८-१९,** उपसमन्वयकाचा कार्यभार प्रा. ए. जी.इंगळे यांच्याकडे सोपवावा व अनुपालन अहवाल मा. कुलगुरु महोदयांकडे सादर करावा.

**प्रतिलीपी -**

१. मा. अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविज्ञान आणि आंतर - विद्याशाखीय अभ्यास.
२. मा.संचालक /विभागप्रमुख विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा - विभाग.
३. मा.प्राचार्य / संचालक /विभागप्रमुख विद्यापीठ संलग्न महाविद्यालय व मान्यता प्राप्त परिसंस्था.
४. मा.संचालक / नियंत्रक अधिकारी /विभागप्रमुख विद्यापीठ प्रशासकीय विभाग.

**प्रत -**

१. विभागप्रमुख , कुलगुरू कार्यालय
२. विभागप्रमुख, प्र- कुलगुरु कार्यालय

D/Shivade/ Avishkar General